# महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

दूरध्वनी क्र.२४०७७४४१ विस्तारीत क्र.१२३४ फॅक्स ०२२-२४०२५१६३·

एस्ट्रेला बॅटरीज कंपाऊंड, लेबर कँप, धारावी रोड, माटुंगा, धारावी, मुंबई-४०० ०१९


---

क्र.:-औसं/सांसाज/ 201- [illegible]                                    दिनांकः- -6 JAN 2016

## प रि प त्र क

विषयः- सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत सादर करण्यात येणाऱ्या कामांबाबत.

***************

महानिर्मिती कंपनीच्या सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत विद्युत केंद्राच्या प्रकल्प परिसरात विविध लोकोपयोगी कामे करण्यात येतात. सदर कामांच्या मंजुरीसाठी विद्युत केंद्र, स्थानिक संस्था, लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत, नगरपरिषद यांचे मार्फत विविध कामांचे प्रस्ताव मंजुरीसाठी या कार्यालयास प्राप्त होत असतात. सदर प्रस्तावांच्या मंजुरीसाठी विविध बाबींची पुर्तता होणे आवश्यक आहे. तसेच सदर कामांची आवश्यकता/निकड, खर्च, व्याप्ती, ठिकाण याबाबतची माहिती नसल्यामुळे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करणे कठीण होते. करिता सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावांमध्ये खालील माहिती देणे आवश्यक आहे.

१) प्रस्तावित काम प्रकल्पबाधीत गावातील आहे किंवा नाही.

२) प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रक स्थापत्य विभागामार्फत तयार करणे.

३) ज्या गावांमध्ये प्रस्तावित कामे करावयाची आहेत, त्या गावातील लोकसंख्याबाबत माहिती, तसेच विद्युत केंद्रापासुनचे अंतर.

४) प्रस्तावित कामांचा प्राधान्यक्रम.

५) प्रस्तावित कामे महानिर्मिती कंपनीच्या सांघीक सामाजिक जबाबदारी धोरणाप्रमाणे योग्य आहेत की कसे याची खात्री करावी.

६) प्रस्तावित कामासंबंधी शासनाच्या इतर योजना सुरु असल्यास, त्याबाबत माहिती.

७) ज्या गावात प्रस्तावित कामे करावयाची आहेत त्या ठिकाणी सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत कामे झाली आहेत किंवा नाही याबाबतची माहिती.

८) कामे मुख्य अभियंता यांनी खात्री करुन प्रस्तावित करावी.

२. लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक संस्थेमार्फत प्राप्त होणारे प्रस्ताव मोघम स्वरुपाचे असल्याने त्याबाबतचा अंदाजित खर्च, कामाची निकड लक्षात येत नाही, यामुळे असे प्रस्ताव वरील माहिती देवून मुख्य अभियंता मार्फत सादर करण्यात यावे.

३. वरील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, अन्यथा सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत मंजुरीसाठी पाठविण्यात येणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

(मनोज रानडे)
कार्यकारी संचालक (मासं)

E:\2015\C.S.R\CSR.doc